(३)


## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर, पिन.- ४२३ १०९

फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७९७/२५८७९९, फॅक्स नं .२५८८७०

(Website- https://www.sai.org.in, E-mail– store@sai.org.in)


### गाईचे शुद्ध तूप विक्री ई-निविदा कम लिलाव

श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागाकडील २३९.२५ क्विंटल गाईचे शुध्द तूप विक्री करणेकामी ऑनलाईन ई-निविदा कम लिलावासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदा कम ई-लिलावाच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. ई-निविदा कम लिलाव निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.२० /०८/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. ०७/०९/२०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा कम लिलाव फॉर्म फी व बयाणा रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४ . शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि. ०८/०९/२०२१ रोजी उघडण्यात येतील. त्यामध्ये पात्र ठरणा-या ई-निविदा कम लिलावधारकांचा कमर्शियल निविदांसाठी विचार केला जाईल.

कोणतीही ई-निविदा कम लिलाव निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

(रविंद्र ठाकरे)

उपमुख्य कार्यकारी अधिकारी

(4)

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109
Phone No.(02423) 258500/258799/258797, Fax No.02423-258870
Website- https://www.sai.org.in, E-mail– store@sai.org.in)

**SALE OF PURE COW GHEE E-TENDER CUM AUCTION NOTICE**

E-tenders cum Auction bids are invited for the sale of Pure Cow Ghee available with Sansthan's Store Department.

1. E-Tender cum Auction & its terms and conditions are available on **www.mahatenders.gov.in.**
2. The E-Tender cum auction for Downloading & Uploading is available from 20 /08 /2021 11.00 AM to 07 /09/2021 upto 5 PM.
3. **Tender Fee & EMD should be paid Online on the website- www.mahatenders.gov.in**
4. If possible Technical Bids will be opened on 08 /09/2021. Those who qualified in Technical bids are liable for Commercial bid.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept any offer or reject all offers without assigning any reason thereof.

(Ravindra Thakare)
DY. CHIEF EXECUTIVE OFFICER

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी- ४२३ १०९.**

**तालुका- राहाता, जिल्हा- अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, भांडार विभाग- २५८७९९, २५८७९७,

फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०

Website – https://www.sai.org.in e-mail- store@sai.org.in, purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय-** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडील गाईचे शुध्द तूप विक्री करणेकामी ई-निविदा कम ई-लिलाव

**A. श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागातील गाईचे शुध्द तूप ई- निविदा कम लिलावाने विक्री करणेबाबत:-**

**B. ई-निविदा कम लिलावासाठी ऑनलाईन सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशील खालीलप्रमाणे:-**

१. संस्थेचे प्रतिनिधी/व्यक्तीचे आधारकार्ड ऑन लाईन जोडणे आवश्यक राहील.

२. ई-निविदा कम लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/ संस्थेला पॅन कार्ड ऑनलाईन सादर करावा लागेल.

३. ई-निविदा कम लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/संस्थेला जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र/ Acknowledgement उपलब्ध असल्यास ऑनलाईन सादर करावे. (Not mandatory)

४. ई-निविदा कम लिलावात भाग घेणारे संस्थेने रजिस्ट्रेशन अगर शासकीय परवाना/शॉप ॲक्ट लायसन असल्यास ऑनलाईन सादर करावे. (Not mandatory)

**C. ई-निविदा कम लिलावामधील शुध्द तूपाचे परिमाण व किंमतीचा तपशील खालीलप्रमाणे-**

| शुद्ध तुपाचा उत्पादक व ब्रॅंड | बॅच नं./ दिनांक | परिमाण | डबे संख्या | वापराची मुदत (दिनांक) |
|---|---|---|---|---|
| मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., भगवानपूर, हरिद्वार, मदरफुड ब्रॅंड | २५/ २२.१०.२०२० | २३९.२५ क्विंटल | १,५९५ | २१.०७.२०२१ |

१. ई-लिलाव करावयाचे गाईचे शुद्ध तुपाचा दर्जा FSSAI Norms प्रमाणे आहे.

२. ई-लिलावातील तूपाचे डबे आहे त्याच स्थितीत विक्री करावयाची आहे. सदर डबे संस्थानचे मध्यवर्ती भांडारमध्ये सकाळी १० ते साय.६ या कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

**D. ई-लिलावासाठी भरावयाची ई-लिलाव फॉर्म किंमत व बयाणा रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे.**

१. ई-लिलाव मध्ये भाग घेण्यासाठी ई-लिलाव फॉर्मची किंमत रु. १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) व बयाणा रक्कम म्हणून रक्कम रु. ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

२. ज्या निविदाधारकाची निविदा/लिलाव नामंजूर होतील त्यांची बयाणा रक्कम विहित पध्दतीप्रमाणे परत केली जाईल.

३. ई-निविदा कम लिलाव निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम भरणे बंधनकारक आहे. यामध्ये कुणालाही सूट मिळणार नाही.

## E. ई-निविदा कम लिलावामध्ये भाग घेणा-यांसाठी सूचनाः-

१) सदर ई-निविदा कम लिलाव ऑनलाईन निविदा कालावधी दि.२० /०८/२०२१ रोजी सकाळी ११ वाजे पासून दि. ७ /०९/२०२१ सायं. ५ वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर राहील. या कालावधीत शुद्ध तूप संस्थानचे भांडार विभागात कार्यालयीन सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत पाहावयास मिळेल.

२) ई-लिलाव कम निविदा तांत्रीक निविदा दि. ०८/०९/२०२१ रोजी उघडण्यात येतील.

३) ई- निविदा कम लिलावानंतर एकूण शूद्ध तुपाची रक्कम संस्थानला प्राप्त झालेनंतर संस्थानचे भांडार विभागातुन तुपाचे डबे १५ किलोचा एक डबा याप्रमाणे वजन करुन देण्यात येतील, नंतर याबाबत तक्रार चालणार नाही.

४) ई-निविदा कम लिलाव झालेले शुद्ध तुपाची ताब्यात घेतलेनंतरचे वापराची जबाबदारी शुध्द तूप विकत घेणा-याची राहील.

५) ई-निविदा कम लिलावातील शुद्ध तुप विकत घेतलेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे नावाचा कुठेही वापर करता येणार नाही.

६) ई-निविदा कम लिलाव शुद्ध तूपासाठी रु. १००/- च्या पटीत बोली रक्कम ऑनलाईन भरावी लागेल.

७) ई-निविदा कम लिलावासंबंधी माहिती पाहिजे असल्यास ती (०२४२३) २५८७९७/२५८७९९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधल्यास मिळू शकेल.

## F. सर्वसाधारण अटी/ शर्तीः-

१) ई-निविदा कम लिलाव अंतिम झालेनंतर अंतिम ई-निविदा/लिलाव उच्चतम किंमत संस्थानला मान्य असल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने ई-निविदा/लिलावाची प्रकिया पूर्ण केली जाईल.

२) ई-निविदा कम लिलावात तुपाची योग्य किंमत आली नाही, असे दिसून आल्यास सदरील ई-निविदा/तुपाचा लिलाव स्थगीत करणेबाबत विचार करता येईल. याबाबतचा संपूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील. याबाबत कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

३) ई-निविदा कम लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तीने लिलावाची अंतिम मान्य झालेली उच्चतम रक्कम विहित मुदतीत संस्थानकडे रक्कम भरुन तूप ताब्यात न घेतल्यास संबंधीतांनी सदर प्रक्रियेसाठी जमा केलेली बयाणा रक्कम त्यांना परत केली जाणार नाही, याबाबत संबंधीतास कुठलीही तक्रार करता येणार नाही.

४) ई-निविदा कम लिलावाच्या अटी व शर्तीमध्ये काही फेरबदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी राखून ठेवले आहेत. त्यावर कोणतीही कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

...२...

५) ई-निविदा कम लिलाव प्रक्रियेत काही अपरिहार्य कारणास्तव वाद निर्माण झाल्यास तो राहाता व कोपरगांव न्यायालयाचे न्यायकक्षेत राहील.

६) ई-निविदा कम लिलावधारकाच्या अटी मान्य केल्या जाणार नाहीत.

७) सदर ई-निविदा कम लिलाव ऑफरचा वैधता कालावधी हा ई-निविदा कम लिलाव निविदा भरावयाचे अंतिम तारखेपासून ३० दिवसांचा राहील.

८) ई-निविदा कम लिलावाबाबतची सर्व माहिती संस्थानच्या वेबसाईट www.sai.org.in वर उपलब्ध आहे.

९) वरील अटी व शर्तीचे सर्व ई-निविदा कम लिलावधारकांनी काटेकोरपणे पालन करावयाचे आहे.

**G. ई-निविदा कम लिलावात भाग घेण्यासाठी शुद्ध तुपाचे दराबाबत खालील बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.**

१) ई-निविदा कम लिलावातील तूपाची मान्य करण्यात आलेली अंतिम उच्चतम रक्कम जीएसटी व सर्व करासहीत राहील.

२) ई-निविदा लिलावात संस्थानकडून विकत घेतलेले शूद्ध तूप घेऊन जाणेकामीचा हमाली, वाराई व वाहतूक खर्च ई-निविदा कम लिलाव घेणारास करावा लागेल.

**H. शुद्ध तुपाचे पेमेंट करण्याची कार्यपध्दती-**

१) ई-निविदा कम लिलावामध्ये अंतिम उच्चतम बोलीला/ई-निविदा उच्चतम रकमेला संस्थानकडून मान्यता मिळालेनंतर ई-निविदा कम लिलाव मंजूर होईल, त्यानंतर लगेचच तीन दिवसात निविदा अंतिम उच्चतम रक्कम/बोलीप्रमाणे शुद्ध तुपाची एकूण किंमत रक्कम संस्थान जमा करुन तुपाची डिलीवरी त्वरीत स्विकारावी लागेल.

२) ई- निविदा कम लिलावातील तूपाची संपूर्ण किंमत रक्कम चेक, डी.डी. अथवा आर.टी.जी.एस. द्वारे जमा केलेनंतर ही रक्कम संस्थान खाती जमा झाल्याची खात्री केलेनंतर शूद्ध तुपाचे डबे ताब्यात देण्यात येतील. डबे ताब्यात मिळाल्यानंतर त्याची पोच द्यावी लागेल.

(रविंद्र ठाकरे)

उपमुख्य कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# ई-लिलावात सहभाग घेणा-याची माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | व्यक्तीचे/ संस्थेचे नांव- | ------------------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------------------ |
| | ऑफीस- | ------------------------------------------------------------ |
| | दुकान- | ------------------------------------------------------------ |
| | निवास- | ------------------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------------------ |
| | ई –मेल | ------------------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------------------ |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | ------------------------------------------------------------ |
| ५. | मालकाचे/ भागीदारांची नावे १. | ------------------------------------------------------------ |
| | २. | ------------------------------------------------------------ |
| ६. | बँक खाते नांव | १.------------------------------------------------------------ |
| | शाखा | २.------------------------------------------------------------ |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------------------ |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------------------ |

दिनांक :- / /२०२१

ठिकाण :-

ई-लिलावात सहभाग घेणाराची स्वाक्षरी व शिक्का

...

लिलावधारकाने ई-निविदा कम लिलावासाठी जोडावयाचे हमीपत्र

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय – गाईचे शुध्द तूप ई-निविदा कम लिलाव पध्दतीने खरेदी करणेबाबत....

महोदय,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्वस्था, शिर्डीकडे शिल्लक असलेली गाईचे शुध्द तूप खरेदी करणेबाबत मी या पत्राद्वारे कळवू इच्छितो की, मी सदर ई-निविदा कम लिलावाच्या सर्व अटी-शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. माझ्या काहीही अटी/ शर्ती नाहीत.

सदर शुद्ध तूप पाहण्यासाठी संस्थानने पुरेसा कालावधी दिलेला होता, याची मला जाणीव आहे.

सदर ई-निविदा कम लिलाव जर मला मंजूर झाला तर मी विहीत रक्कम संस्थानकडे विहीत वेळेत विहीत पध्दतीने जमा करुन संस्थानच्या भांडार विभागाचे कार्यालयीन वेळेत सदर शुध्द तूपाची डिलीव्हरी स्वीकारील. मी संस्थानचे शुध्द तूप विकत घेतले म्हणून संस्थानचे नांवाचा वापर करणार नाही. तसेच सदर शुध्द तूप माझ्या ताब्यात मिळालेनंतरची जबाबदारी माझी राहील. सदर शूद्ध तूपाची गुणवत्ता किंवा तपासणी अहवालातील निष्कर्ष अहवालाबाबत संस्थानची कोणतीही जबाबदारी राहणार नाही, हे मला मान्य आहे.

कळावे,

आपला,

ई-निविदा कम लिलावधारकात भाग घेणारे व्यक्तीची/
संस्थेच्या प्रतिनिधीची सही .

## ई-निविदा कम लिलाव बीड सोबत ऑनलाईन सादर केलेली कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. ई-निविदा कम लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/ संस्था पॅन कार्ड

२. संस्थेचे प्रतिनिधी/व्यक्तीचे आधारकार्ड

३. ई-निविदा कम लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/संस्थेचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र/ Acknowledgement ची प्रत उपलब्ध असल्यास (Not mandatory)

४. ई-निविदा कम लिलावात भाग घेणारे संस्थेने रजिस्ट्रेशन अगर शासकीय परवाना/ शॉप ॲक्ट म उपलब्ध असल्यास (Not mandatory)

५. ई-निविदा कम लिलावधारकाने ई-निविदा कम लिलावासाठी जोडावयाचे हमीपत्र

दिनांक :- / /२०२१

ठिकाण :-

ई-निविदा कम लिलावात सहभाग घेणाराची स्वाक्षरी व शिक्का

...

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

Sale of Pure Cow Ghee E-tender cum Auction

BOQ

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate per quintal With all | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Cow Ghee Pure Motherfood Brand 15 kg.New Tin Packing FSSAI Standards Total 1,595 Tins | 239.25 | Quintals | | |

(Ravindra Thakare)

Dy. Chief Executive Officer